# एक नवे पाऊलः रुग्ण हक्कांसाठी पुणेकरांचा पुढाकार

सरकारी आरोग्य सेवेप्रमाणे खाजगी डॉक्टरांकडून मिळणा-या सेवेबद्दलही आज समाजात बरेच असमाधान आहे. त्यामागे एक महत्वाचे कारण म्हणजे डॉक्टर व रुग्ण यांच्यामधील संवादातील कमतरता. रुग्णांच्या अपेक्षा व डॉक्टरी व्यवसायाचे तंत्र,पद्धत यामध्ये अनेकदा खूप तफावत दिसते. रुग्ण डॉक्टरांमधील संवाद वाढण्याची तसेच दवाखान्यामध्ये रुग्ण हक्कांची जोपासना होण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी सुजाण, सजग नागरिकांनी पुढाकार घ्यावा. या उद्देशाने दि. २८ मार्च रोजी सायं.४ वाजता लोकायत पुणे येथे एक बैठक आयोजित करण्यात आली.

सदर बैठकीमध्ये रुग्ण व डॉक्टर यांच्यामधील संवादाचा अभाव, रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्यामध्ये दवाखान्याबद्दल असणारा असंतोष, डॉक्टरांवर होणारे हल्ले व त्यामागील कारणे, रुग्ण हक्कांचे उल्लंघन, वैद्यकीय व्यवस्था मधील वाढत्या अनिष्ट प्रवृत्ती यांवर चर्चा करण्यात आली. या सर्वांवर मात करण्यासाठी रुग्ण व डॉक्टर यांच्यामध्ये सुसंवाद वाढायला हवा. रुग्ण हक्कांबद्दल जनजागृती करायला हवी असे मत मांडले गेले. ‘सुधारित बॉम्बे नर्सिग होम रजिस्ट्रेशन कायद्या’अंतर्गतच्या नियमावली मध्ये रुग्ण हक्कांचा समावेश आहे. पण या नियमावलीला अंतिम मंजुरी मिळणे व ती मिळाल्यावर त्याची अमंलबजावणी कशी होते हे नागरिकांच्या सजगतेवरच अवलंबून आहे. म्हणूनच पुण्यामध्ये ‘रुग्ण हक्क परिषद’ चे आयोजन करावे आणि त्यासाठी जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करावा, अशी सुचना पुढे आली. अशी व्यापक जनजागृती करत असतानाच पुण्यातील बुध्दिजीवी थरातील तसेच लोकमान्यता असलेल्या नागरिकांनी एकत्र येऊन ‘रुग्ण हक्क संवर्धन समिती’ स्थापन करावी व या समितीच्या वतीने डॉक्टरांच्या प्रतिनिधींशी, विविध इस्पितळ व्यवस्थापकांशी आपल्या सर्व साधारण मागण्या, अपेक्षा याबाबत चर्चा करुन उभयपक्षी काही चांगल्या प्रथा पाडण्याचा प्रयत्न करावा असे ठरले.

या बैठकीमध्ये ‘जन आरोग्य अभियाना’चे डॉ. अनंत फडके, डॉ. अभय शुक्ला. डॉ. निलांगी सरदेशपांडे, डॉ. अभिजित मोरे, अनुपमा पाठक; ‘लोक विज्ञान संघटने’चे श्री. सोमण, श्री. गुत्तीकर; जेष्ठ व्यंगचित्रकार श्री. मंगेश तेंडूलकर, ॲड. जया सागडे, श्री. मगेश रामादॉस; ‘प्रयास’चे डॉ. विनय कुलकर्णी; ‘आरोग्य डॉट कॉम’चे श्री. द्विजेन, सोनाली पालकर; ‘कागद काच पत्रा संघटने’च्या नेहा कागल यांनी सहभाग घेतला.

पुढील बैठक दि. ९ मे, २००९ रोजी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बैठकीचे स्थळः ‘लोकायत’

तळमजला, लिनोव्हो बिल्डींग,

सिंडीकेट बँकेच्यासमोर

लॉ-कॉलेज रोड, नळ स्टॉपजवळ, पुणे.

वेळः दुपारी ३ ते ६